# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ०१/०३/२००६ रोजी सभा सुचना क्र. २७ दि. २३/०३/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १०) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ११) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १२) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १३) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १४) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, महानगरपालिकेचे अधिकारी वर्ग आणि महानगरपालिका कर्मचारी वर्ग. मी या ठिकाणी आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो आणि सचिवांनी सभेला सुरुवात करावी असे निर्देश देतो.

(सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(सचिवांनी प्रकरण क्र. २१३ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

सन २००५-०६ सुधारित व सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पावर चर्चा करत असतांना महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रकल्पाचा लाभ सर्वप्रथम सामान्य व्यक्तिंना मिळणे तसेच प्रत्येक मुलभूत नागरी सेवा जनमाणसांपर्यंत पोहोचणे हे अर्थसंकल्पाचे उद्दीष्ट असणे आवश्यक असते. या अर्थसंकल्पामध्ये पर्यावरणाभीमुख नवीन प्रकल्पाचे नियोजन करण्यांत आले असुन प्रलंबीत प्रकल्पाकरीता पर्यावरणाभीमुखतेच्या दृष्टीने संवेदनशील अशा मलनिःसारण प्रकल्प, एकात्मीक नाले विकास, शास्त्रोक्त पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन, भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण, तलाव संवर्धन व व्यवस्थापन कार्यक्रम इत्यादि प्रकल्प प्रस्तावित करण्यांत आलेले आहेत. नागरीकरणाची गती कमी जास्त हाऊ शकते. परंतु नागरीकरणाची प्रक्रिया थांबवणे केवळ आवश्यक असते. महानगरपालिका स्थापनेपासून ग्रामीण भागातील विकास कामास काही प्रमाणात जरा खर्च झाला असला तरी विकास कामाचे फायदे व मुलभूत सेवांच्या लाभापासून आजमितीस देखील येथील नागरीक बऱ्याच प्रमाणे वंचीत आहेत. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही अशा प्रकारे अविकास भागावर अधिक लक्ष देण्याचा या अर्थसंकल्पात प्रयत्न केला आहे. सन २००६-२००७ वर्षासाठीच्या अर्थसंकल्पाची त्रिस्तरीय आखणी करण्यात आली असल्याने महानगरपालिकेने आरोग्य, पर्यावरण समतोल, व विकास

प्रकल्पाचा लाभ सामान्य नागरीकांपर्यंत पोहोचवणे शक्य होणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढेल यावर प्रशासन व लोकप्रतीनिधींनी लक्ष केंद्रीत करायला पाहिजे. ज्यावेळी शहराचा विकास झपाट्याने होतो तेव्हा उत्पन्नाच्या बाबी (स्त्रोत) बघायला पाहिजे. पण तशा प्रकारचे काहीही होत नाही त्यामध्ये प्रशासन दुर्लक्ष करत आहे. पालिका क्षेत्रात नविन बांधकाम चालू आहेत. ज्या इमारती कित्येक वर्षे तयार होऊन त्यांना अजुनही कर आकारणी केली नाही. अशा इमारतींचा सर्व्हे करुन त्वरीत कर आकारणी करावी. त्यामुळे उत्पन्नात भर पडेल तसेच ज्या कारखानदाराने आपल्या गाळ्यावर उंची वाढवून माळे व पोटमाळे काढले आहेत अशांची पाहणी करुन परवानगी शुल्क व कर आकारणी करावी. हॉटेल, दुकाने व अन्य कारणासाठी वेदर शेड बांधल्या असतील तर परवानगी शुल्क व कर आकारणी करावी. महानगरपालिका हद्दीत उभ्या असणाऱ्या विविध कंपन्यांच्या टॉवरवर परवानगी शुल्क व वार्षिक कर आकारणी करावी. जेणेकरुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. रहिवाशी निवासात बदल करुन व्यापारी गाळे करुन उद्योग करण्यांत येत आहे अशांना कमर्शिअल कर आकारावा. कारखाने व दुकाने गाळ्यांचे नोंदणी करुन नोंदणी शुल्क व परवाना शुल्क आकारावे व दरवर्षी (रिन्युव्ह) परवाना करावा. महानगरपालिका क्षेत्रात होणाऱ्या बांधकामाचा विकास कर इतर महानगरपालिकेप्रमाणे कमी आहे तरी १०० रुपये जमीन विकास कर व बांधकाम विकास कर २५० आकारावा. जेणेकरुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात निश्चित भरीव वाढ होईल. इमारत परवानगी देण्याच्या वेळी ट्री मॅपिंग प्लॅन सादर करुनच त्यांना परवानगी देण्यात यावी. अशाने पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. तसेच मोठ्या गृहसंकुलामध्ये रेन वॉटर हारवेस्टींगचे प्रकल्प लावण्यासाठीच सक्ती कावी. तसेच पाण्याची बचत व पावससच्या पाण्याचा वापर करावा. गार्डनस्, मैदाने, तरणतलाव, मार्केट विकसित करावी. तरणतलाव व मार्केट ह्या माध्यमातून उत्पन्न मिळू शकेल. हॉस्पीटल व पॅथोलॉजिक लॅब उभाराव्या. आज ह्या सुविधांसाठी जनतेला बराचसा पैसा मोजावा लागतो. या सुविधेने मध्यमवर्गीय जनतेला दिलासा मिळेल. जाहिरात करात होर्डीगच्या करात वाढ करावी. शहरात लागलेल्या विविध होर्डींगवर कर आकरणी सक्तीची करावी. परिवहनच्या बसेसवर जाहिरात कर आकारावा. बस स्टॉपवर जाहिरात करुन कर आकारावा. उड्डाणपुलाखालील गाळे भाड्याने देऊन भाडे आकारावे. उड्डाणपुलाच्या भिंतींवर जाहिराती करुन होर्डींग्ज लावून उत्पन्न वाढवावे. वाढीव लोकसंख्येच्या मानाने नविन पाणी पुरवठा योजनेला विलंब लागेल. तत्पुर्वी मंत्रालय स्तरावर वाढीव पाणी मिळविण्यासाठीची उपाययोजना करावी.

**शरद बेलवटे :-**

२८१४६.२२ स्थायी समितीने त्यामध्ये वाढ सुचवून २९८१६.९८ चे बजेट केले. परंतु, त्यामध्ये २५-२५ कोटीची अशी कर्जाची ५० कोटीची वाढ केलेली आहे. असे एकूण ३७३१६.९८ इतक्या रक्कमेचे बजेट बनवलेले आहे आणि ह्यामध्ये २० कोटी रुपये डेप्रिसिएशन फंडमध्ये चालले आहे. आत्ता ते परत फेरफार करुन २० कोटीने कमी करायला लागणार आहे. काटछाट केले नाही तर पुढे पगाराला वाढ होतील. कॅपिटल इन्कम कसा वाढेल ह्याचा कोणीच विचार करत नाही. कॅपिटल इन्कमसाठी कोणी प्रयत्न करत नाही.

**केशव घरत :-**

१९ लाख रुपये आम्ही वाढवून दिले आहे ना.

**सुर्यकांत भोईर :-**

१९ लाख रुपये आम्ही वाढवून दिले आहे ना.

**मोहन पाटील :-**

आत्ता आपण ह्या ज्या फिगर दाखवल्या आहेत तसा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे. अनुमोदन कोण देईल?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर हे अनुमोदन देतील.

**गजानन भोईर :-**

सदर ठरावाला मी अनुमोदन दिले, बाबा जा.

**मा. सभापती :-**

आपण ज्या सुचना मांडल्या त्या सुचनेसह हे बजेट सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. २१३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००५-०६ चे सुधारित व २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. २१७ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २००५/२००६ चे सुधारित व सन २००६/२००७ च्या मुळ अंदाजपत्रकास कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल तसेच प्रत्येक विभागांची तपशिलवार माहिती विचारात घेवून मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ आणि त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २००६/२००७ या वित्तीय वर्षात रक्कम रु. **3.47** लाख

इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | 2005/06 | 2006/07 |
|---|---|---|
| अंदाजपत्रक ''अ''+''ब''+''क''+वृक्षप्राधिकण एकूण जमा | 28298.49 | 35273.38 |
| अंदाजपत्रक ''अ''+''ब''+''क''+वृक्षप्राधिकण एकूण खर्च | 28274.37 | 35269.91 |
| अखेरची शिल्लक | 24.12 | 3.47 |

**सुचक :- श्री. मोहन पाटील. अनुमोदन :- श्री. गजानन भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २१४ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. २१४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००५-०६ चे सुधारित व २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. २१८ :-**

मा. परिवहन सभापती, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २००५/२००६ चे सुधारित व सन २००६/२००७ च्या मुळ अंदाजपत्रकास कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल तसेच प्रत्येक विभागांची तपशिलवार माहिती विचारात घेवून मा. परिवहन सभापतीचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ आणि त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २००६/२००७ या वित्तीय वर्षात रक्कम रु. **1.04** लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | 2005/06 | 2006/07 |
|---|---|---|
| ''महसुली''+''भांडवली''''+असाधारण'' एकूण जमा | 422.14 | 1179.44 |
| ''महसुली''+''भांडवली''''+असाधारण'' एकूण खर्च | 421.10 | 1178.40 |
| अखेरची शिल्लक | 1.04 | 1.04 |

**सुचक :- श्री. मोहन पाटील. अनुमोदन :- श्री. गजानन भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २१५ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. २१५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २००५-०६ चे सुधारित व २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. २१९ :-**

मा. अध्यक्ष, वृक्षप्राधिकरण समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात वाढ करुन रक्कम रु **31.70** लाख 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण करण्यास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

| तपशिल | 2005/06 | 2006/07 |
|---|---|---|
| एकूण जमा | 138.00 | 163.30 |
| 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | 12.50 | 31.70 |
| एकूण खर्च | 150.50 | 195.00 |

**सुचक :- श्री. मोहन पाटील. अनुमोदन :- श्री. गजानन भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण :-**

मार्गस्थ फी आकरणेबाबत.

**ठराव क्र. २२० :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १४७ नुसार त्वरीत निर्यात करावयाचा जकातपात्र माल महानगरपालिका क्षेत्रातून प्रवेश नाक्यावरुन निर्गमन नाक्यावर जाताना लेखी परवानगी नि पारकमन पास प्रदान करुन संबंधिकाकडून मार्गस्थ दाखला फी (एस्कॉर्ट) आकारणी बाबतची तरतुद समाविष्ट आहे. तद्नुरुप मिरा भाईंदर महानगरपालिकेने प्रारुप जकात नियमावलीत नियम क्र. १७(२) अन्वये मार्गस्थ दाखला फी आकारणी करणेची तरतुद प्रस्तावित केलेली आहे. उक्त जकातीचे प्रारुप नियम मा. महासभेच्या मंजुरीकरिता सादर केलेले आहेत.

| वाहनाचा प्रकार | तीन चाकी टेंपो | चार चाकी टेंपो | लॉरी | कंटेनर |
|---|---|---|---|---|
| **आकारण्यांत येणारे दर** | १० रु. प्रति वाहन | २५ रु. प्रति वाहन | ८० रु. प्रति वाहन | १०० रु. प्रति वाहन |

प्रारुप जकात नियमावलीबाबत मा. महासभेच्या मंजुरीस अधीन राहून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून जकात पात्र माल घेऊन त्वरीत निर्गत होणाऱ्या वाहनांवर वरील प्रमाणे मार्गस्थ दाखला फी (एस्कॉर्ट) आकारणी करणेबाबत ही सभा मंजुरी देत आहे. तसेच मा. महासभेच्या मंजुरी करिता ही सभा शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण :-**

हस्तांतरण फी मध्ये वाढ करणेबाबत.

**ठराव क्र. २२१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्रमांक २९, दि. ०३/०५/२००२ प्रमाणे मालमत्ता हस्तातरण करणे करिता निवासी रु. ५००/-, बिगर निवासी रु. १,०००/- विशेष हस्तांतरण फी आकारण्यांस मंजुरी देण्यांत आलेली होती. यापुढे दि. ०१/०४/२००६ पासून निवासी रु. १,०००/-, बिगर निवासी रु. १,५००/- अशी विशेष हस्तांतरण फी मध्ये वाढ देण्यंस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण :-**

कॅपिटेशन फी आकारणेबाबत.

**ठराव क्र. २२२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. ७४, दि. १८/०२/२००५ प्रमाणे सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे कॅपीटेशन फी आकरण्यांस मंजुरी देण्यांत आलेली होती. यापुढे दि. ०१/०४/२००६ पासुन सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे कॅपीटेशन फी मध्ये वाढ देण्यांस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण :-**

विकास आकाराचे दर व भोगवटा दाखला प्राप्त न करता रहिवास व्याप्त इमारतीसाठी दंडनीय शुल्क निश्चित करणेबाबत..

**ठराव क्र. २२३ :-**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ प्रमाणे विकास आकार रक्कम वसूल करणेबाबत अधिनियमातील तरतूद दि.१०/०८/९२ पासून लागु झालेली आहे. तत्कालीन नगरपरिषद कालावधीत ठराव क्र. ७४ दि.०५/०८/९२ च्या विशेष सभेद्वारे ठरविलेल्या दरानुसार विकास आकाराची रक्कम तीन टप्प्यात वसूल करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

१) बांधकाम नकाशे मंजूर करतेवेळी - २५%
२) बांधकाम प्रारंभपत्र देते वेळी - २५%
३) भोगवटा दाखला देते वेळी - ५०%

तद्नंतर सदर ठरावात बदल करुन सर्वसाधारण सभा दि.०९/११/९३ ठराव क्र. २९२ अन्वये विकास आकार रक्कम वसुली बाबत सुधारीत धोरण ठरविण्यात आले. सदरच्या धोरणानुसार विकास आकार रक्कम ही तीन टप्प्या मध्येच वसूल करावयाची आहे.

१) बांधकाम नकाशे मंजूर करते वेळी - जमिनीचा पुर्ण विकास आकार तसेच बांधकाम क्षेत्राचा ५०% देय विकास आकार.
२) बांधकाम प्रारंभपत्र देते वेळी - बांधकाम क्षेत्राच्या ५०% रक्कम.
३) जोत्याचे प्रमाणपत्र - उल्लेख केलेला नाही.

तद्नंतर नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. १०६(अ) दि.३०/०३/९८ नुसार विकास आकाराचे सुधारीत दर निश्चित करण्यात आले ते खालील प्रमाणे आहेत.

१) जमिनीचा विकास - रु. ३०/- प्रती चौ.मी.
२) निवासी बांधकाम क्षेत्र - रु. ६०/- प्रती चौ.मी.
३) औद्योगिक बांधकाम क्षेत्र - रु. ९०/- प्रती चौ.मी.
४) वाणिज्य बांधकाम क्षेत्र - रु. १२०/- प्रती चौ.मी.

सदर दर हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ 'अ' ते 'ल' प्रमाणे कमाल दर आहेत. या सुधारीत दरास शासनाने पत्र क्र. टीपीएस/१२९८/७५६/प्र.क्र.१६० /९८/नवि-१२, दि.२७/१०/९८ अन्वये मंजूरी प्राप्त असून दराची अंमलबजावणी १ नोव्हेंबर १९९८ पासून अंमलात आलेली आहे.

तत्कालीन नगरपरिषद कालावधीत वास्तुविशारद मे. गुप्ते वढावकर असो. यांनी दि.२७/०४/९८ रोजी मा. शासनाकडे निवेदन सादर करुन बांधकाम नकाशे मंजूर करताना विकास आकाराची रक्कमं नगरपरिषदेकडून वसुल करण्याचा आग्रह करण्यात येत आहे. याबाबत हरकत उपस्थित केली होती. सदर निवेदन वजा तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने पत्र क्र. टीपीएस/१२९८/७७७/नवि-१२, दि.०२/०६/९८ अन्वये विकास आकाराची रक्कम बांधकाम प्रारंभपत्र देण्याच्या वेळीच आकारण्यात यावी तसेच बांधकाम नकाशा मंजूर करतेवेळी विकास आकाराच्या वसुली बाबतीत तक्रारी येणार नाहीत याची दक्षता घ्यावयासाठी कळविण्यात आले होते. त्यामुळे विकास आकाराची रक्कम ही बांधकाम प्रारंभपत्राच्यावेळीच वसुल करणे क्रमप्राप्त ठरले व त्याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

शासनाच्या आदेशाप्रमाणे विकास आकार वसूलीबाबतच्या धोरणामुळे नगरपरिषद / महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नावरही परिणाम होत आहे. म्हणून प्रशासकिय ठराव क्र. १६५, दि.०९/०७/२००२ अन्वये विकास आकार रक्कम वसूली बांधकाम नकाशे मंजूर करताना एकरक्कमी वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सद्यस्थितीत याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. सन २००२-०३ पासूनचा विकास आकार रक्कम वसुलीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | जमा विकास आकार (रु. कोटी) |
|---|---|---|
| १ | २००२-०३ | ४.१० |
| २ | २००३-०४ | ६.०० |
| ३ | २००४-०५ | ४.५८ |

सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात विकास आकार रक्कम वसूली या शिर्षा खाली रु. १२ कोटी वसुल करणे प्रस्तावित आहे. प्रशासनाने मा.स्थायी समितीस रु. ७ कोटी तरतुद ठेवण्याचे प्रस्तावित केले होते. सद्यस्थितीत माहे फेब्रुवारी २००६ अखेर रु. ६.६ कोटी इतकी रक्कम वसूल झालेली आहे.

याबाबत खालील प्रमाणे मंजूरी मिळाल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ अपेक्षित आहे.

१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम - १२४ 'अ' ते 'ल' च्या तरतूदीप्रमाणे विकास शुल्क आकारणीची तरतूद शासनाने दि.१०/०८/१९९२ पासून अंमलात आणलेली आहे. त्यामध्ये विकास शुल्काचे दर मुंबई महानगरपालिका वगळता उर्वरीत महानगरपालिकेसाठी खालील प्रमाणे आकारावयाचे आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावाचा तपशिल | नियमाप्रमाणे दर रुपये प्रती चौ.मी. | | महानगरपालिकेने लागू केलेले दर रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| | | किमान | कमाल | |
| १ | जमीन विकास शुल्क | २० | ६० | ३० |
| २ | रहिवासी बांधकाम | ४० | ६० | ६० |
| ३ | औद्योगिक बांधकाम | ६० | ९० | ९० |
| ४ | वाणिज्य बांधकाम | ८० | १२० | १२० |

मा. आयुक्त सो. यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेची हद्द मुंबई शहरालगत असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये मुंबई महानगरपालिकासाठीचे विकास आकाराबाबतचे दर मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी प्रस्तावित करणेबाबत आदेशीत केलेले आहे.

त्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ 'अ' ते 'ल' च्या तरतुदीप्रमाणे विकास शुल्क आकारणीची तरतुद शासनाने दि.१०/०८/९२ पासून अंमलात आलेली आहे. त्यामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या अभिकारितेतील क्षेत्रासाठीचे विकास शुल्काचे दर खालील प्रमाणे आकारायचे आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावाचा तपशिल | नियमाप्रमाणे दर रुपये प्रती चौ.मी. | | मिरा भाईंदर महानगरपालिकेने लागू केलेले दर रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| | | किमान | कमाल | |
| १ | जमीन विकास शुल्क | ४० | १०० | ३० |
| २ | रहिवासी बांधकाम | १०० | २५० | ६० |
| ३ | औद्योगिक बांधकाम | १५० | ३७५ | ९० |
| ४ | वाणिज्य बांधकाम | २०० | ५०० | १२० |

वरील प्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या अभिकारितेतील क्षेत्रासाठीच्या विकास आकाराच्या दराचा व मिरा भाईंदर महानगरपालिकेने लागू केलेल्या विकास आकाराच्या दराचा विचार करता खालील प्रमाणे विकास आकाराचे दर निश्चित करणे आवश्यक वाटते.

| अ.क्र. | प्रस्तावाचा तपशिल | मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी प्रस्तावित दर रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|
| १ | जमीन विकास शुल्क | १०० |
| २ | रहिवासी बांधकाम | १५० |
| ३ | औद्योगिक बांधकाम | २२५ |
| ४ | वाणिज्य बांधकाम | ३०० |

२) मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारतीचे बांधकाम पुर्ण केल्यानंतर भोगवटा दाखला घेणे आवश्यक असून भोगवटा दाखल्याशिवाय इमारती रहिवास व्याप्त करता येत नसतानाही बरेच विकासक / वास्तुविशारद भोगवटा दाखला घेत नाहीत तसेच भोगवटा दाखल्यापुर्वी इमारती रहिवास व्याप्त करतात. भोगवटा दाखल्यापुर्वी इमारत रहिवास व्याप्त केल्यास त्यासाठी दंडात्मक कारवाई करणेबाबत धोरण निश्चित करणे उचित वाटते. आर्थिक दंड म्हणून विकास आकाराप्रमाणे प्रती चौरस मीटर रु.६०/- रहिवास वापरासाठी, रु.१२०/- प्रती चौरस मीटर वाणिज्य वापरासाठी व रु.९०/- प्रती चौरस मीटर औद्योगिक वापरासाठी अशाप्रमाणे दंडाची आकारणी निश्चित करणे आवश्यक आहे.

३) तसेच सन २००६-०७ च्या आर्थिक वर्षासाठी विकास आकाराच्या रक्कमेत वाढ अपेक्षित आहे. त्यासाठी यापुर्वीच्या तात्कालीन नगरपरिषदेच्या सर्व साधारण सभेतील ठराव क्र. ७५, दि.०५/०८/९२ प्रमाणे बंदिस्त बाल्कनीसाठी शुल्क दंडणिय शुल्क म्हणून रु.५००/- प्रती बाल्कनी निश्चित केलेली आहे. यामध्ये सुधारणा करुन जमिनीच्या बाजारी दराप्रमाणे प्रिमियम रक्कम (प्रती चौ.मी.) आकारुन बंदिस्त बाल्कनी साठी शुल्क आकारणे योग्य होईल.

वरील प्रमाणेचे बदल करण्यास व विकास आकाराबाबत मा. शासनाकडे मंजूरीसाठी शिफारस करण्यासाठी ही स्थायी समिती सभा मा. महासभेची मंजुरी घेण्यांस शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. रतन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपण सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.४५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**